


## आप चे 15 उमेदवार जाहीर

e Paper

# दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in रविवार दिनांक 16/11/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 267 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# शिवसेना स्वबळावर निवडणूक लढणार - खा.बारणे




## महापालिका निवडणुकीसाठी १२८ जागा लढविण्याची तयारी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी - आगामी पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीला पूर्ण ताकदीने सामोरे जायचे आहे. त्यासाठी ३२ प्रभागातील १२८ जागांवर निवडणूक लढविण्याची तयारी करावी, अशा स्पष्ट सूचना शिवसेनेचे उपनेते, खासदार श्रीरंग बारणे यांनी शिवसैनिकांना दिल्या. तसेच युतीबाबत वरिष्ठ पातळीवर निर्णय होईल. जो निर्णय होईल, त्याची अंमलबजावणी केली जाईल, असेही त्यांनी सांगितले.**

महापालिका निवडणुकीच्या तयारीच्या दृष्टीने शिवसेनेचा शनिवारी (१५ नोव्हेंबर) पिंपरीत पदाधिकारी प्रशिक्षण मेळावा पार पडला. यावेळी महानगर प्रमुख राजेश वाबळे, शहरप्रमुख निलेश तरस, महिला संघटिका सरिता साने यांनी केले आहे. उपनेत्या सुलभा उबाळे, इरफान सय्यद, युवा सेनेचे पश्चिम महाराष्ट्र सचिव विश्वजीत बारणे, महानगर प्रमुख राजेश वाबळे, शहरप्रमुख निलेश तरस, महिला संघटिका सरिता साने, माजी नगरसेवक प्रमोद कुटे, निलेश बारणे, बाळासाहेब ओव्हाळ, माजी नगरसेविका विमल जगताप, जिल्हा समन्वयक बाळासाहेब वाल्हेकर, युवासेना जिल्हाप्रमुख सागर पाचारणे, उपजिल्हा प्रमुख दिलीप पांढारकर, युवासेना शहर प्रमुख माऊली जगताप, युवतीसेना शहर प्रमुख रितू कांबळे, लोकसभेचे युवा सेनेचे अध्यक्ष राजेंद्र तरस, निलेश मुटके, सायली साळवे आदी उपस्थित होते.

> “भाजप आणि शिवसेनेची नैसर्गिक युती आहे. महापालिका निवडणुकीत युतीबाबतचा निर्णय वरिष्ठ पातळीवर होईल. भाजपसोबत युतीला प्राधान्य आहे. शिवसेना पूर्ण ताकदीनिशी महापालिका निवडणुकीत उतरणार आहे. शिवसेनेने १२८ जागांवर निवडणूक लढविण्याची तयारी सुरू केली आहे. शिवसैनिकांनी गाफील राहू नये. मतदारयाद्याकडे लक्ष द्यावे. प्रभागाचा बारकाईने अभ्यास करावा. सूक्ष्म नियोजन करून कामाला लागावे. महापालिका सभागृहात शिवसेनेचे संख्याबळ वाढवायचे आहे. त्यादृष्टीने कामाला सुरुवात करावी.”
>
> • **श्रीरंग आप्पा बारणे** खासदार, मावळ लोकसभा

> “शिवसेनेचे मुख्य नेते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री असताना मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना आणली आहे. या योजनेतून महिलांना आर्थिक मदत मिळत आहे. महिला मोठ्या संख्येने शिवसेनेसोबत जोडल्या आहेत. शिंदे मुख्यमंत्री असताना आणलेल्या लोकोपयोगी योजना आणि महायुती सरकारच्या योजना लोकांपर्यंत पोहोचवव्यात. लोकांना लाभ मिळवून द्यावा.”
>
> • **सौ.सुलभाताई उबाळे** शिवसेना, उपनेत्या

> “शहरात शिवसेनेची संघटनात्मक ताकद वाढली आहे. शिवसेनेने घरोघरी जाऊन सभासद नोंदणी केली आहे. सभासद नोंदणीस चांगला प्रतिसाद मिळाला आहे. त्यामुळे शिवसेनेबाबत सकारात्मक वातावरण आहे. शिवसेनेत दररोज पक्ष प्रवेश होत आहेत. याचा आगामी महापालिका निवडणुकीत शिवसेनेला फायदा होईल.”
>
> • **इरफानभाई सय्यद** शिवसेना उपनेते

> “युवासेनेची चांगली बांधणी झाली आहे. त्यामुळे युवा सेनेच्या जास्तीत जास्त पदाधिकाऱ्यांना निवडणूक लढविण्याची संधी देण्याबाबत पक्ष नेतृत्वाकडे आग्रह राहील. उमेदवारांनी जनसंपर्क वाढविण्यावर भर द्यावा. लोकांपर्यंत पोहोचावे. गाफील न राहता निवडणुकीच्या तयारीला लागावे.”
>
> • **विश्वजीत बारणे** (युवासेना सचिव-पश्चिम महाराष्ट्र)

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
रविवार दिनांक 16/11/२०२५
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# मनपा निवडणुकीकरिता 'आप' ने घेतली आघाडी

# आप चे 15 उमेदवार जाहीर

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीच्या रणधुमाळीत आम आदमी पार्टीने भ्रष्टाचाराविरुद्ध निर्णायक लढा पुकारला आहे. 'आप'चे नेते अजित फाटके यांच्या नेतृत्वाखाली, आगामी निवडणुकांसाठी पक्षाची पहिली उमेदवारी यादी जाहीर करण्यासाठी आणि शहराच्या विकास आराखड्यावर चर्चा करण्यासाठी एका अत्यंत महत्त्वपूर्ण पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या पत्रकार परिषदेत आम आदमी पक्षाच्या वतीने १५ उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली.**




पिंपरी चिंचवड शहरात भाजप, राष्ट्रवादी, शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष या मुख्य राजकीय पक्षांना मागे सोडत आम आदमी पार्टीने आपली 15 उमेदवारांची यादी जाहीर करून महानगरपालिका निवडणुकीत आघाडी घेतली आहे.पिंपरी चिंचवड शहरातील ३२ प्रभागातील सर्वच्या सर्व म्हणजे १२८ जागेवर आम आदमी पक्ष आपले उमेदवार देणार आहेत. पहिली यादी जाहीर करताना १५ उमेदवारांची नावे जाहीर करण्यात आली तसेच पालिका निवडणूक जाहीर होईपर्यंत टप्प्याटप्प्याने अन्य उमेदवार ही जाहीर करण्यात येतील, अशी माहिती पिंपरी चिंचवड आम आदमी पक्षाचे शहराध्यक्ष रविराज काळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.यासोबतच, प्रभाग निहाय व आरक्षण निहाय जागेसाठी उमेदवारांची पहिली यादी जाहीर करण्यात आली.

**उमेदवारांची नावे अशी आहेत:**

1) इम्रान मुस्ताक खान (प्रभाग ३ सर्वसाधारण ड), 2)मंगेश अनंत आंबेकर (प्रभाग ७ सर्वसाधारण ड), 3)संजीव झोपे (प्रभाग ९ सर्वसाधारण ड पुरुष), 4)ब्रह्मानंद जाधव (प्रभाग १० सर्वसाधारण ड), 5)कुणाल वक्ते (प्रभाग ११ सर्वसाधारण ड),

6)शीतल स्वप्नील जेवळे (प्रभाग १२ सर्वसाधारण महिला क),

7) वैजनाथ अंजिनाथ शिरसाट (प्रभाग १४ नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग अ),

8)विकी रोहिदास पासोटे (प्रभाग १६ अनुसूचित जाती अ),

9) शिवकुमार बनसोडे (प्रभाग १६ सर्वसाधारण ड), 10) राहुल निवृत्ती मदने (प्रभाग १७ नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग ब), 11) सचिन लक्ष्मण पवार (प्रभाग १८ सर्वसाधारण ड),

12) नवनाथ दशरथ मस्के (प्रभाग १९ सर्वसाधारण ड, 13) शुभम यादव (प्रभाग २० सर्वसाधारण ड), आणि 14) उमा यल्लाप्पा वालदोर (प्रभाग ३० सर्वसाधारण महिला ड).

15 )अकिल अहमद शेख (प्रभाग क्रमांक 30 नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग क)

# शत्रुघ्न काटे यांच्या सहामाही कामकाजाचा विक्रम!

## १८० दिवसात १९४ कार्यक्रम

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड शहर जिल्हा भारतीय जनता पार्टीच्या अध्यक्षपदाची सूत्रे स्विकारल्यानंतर शत्रुघ्न काटे यांनी अवघ्या सहा महिन्यात पक्षाचे तसेच प्रदेशाकडून आलेले आणि सार्वजनिक स्वरूपाचे मिळून तब्बल १९४ कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडल्याचा विक्रम केला आहे. १६ मे रोजी आमदार व प्रदेश भाजपचे निरीक्षक सिद्धार्थ शिरोळे यांच्या हस्ते अध्यक्ष निवडीचे पत्र श्री.काटे यांना देण्यात आले. उद्या (१६ नोव्हेंबर)पक्षाचे जिल्हाध्यक्ष म्हणून त्यांनी सूत्रे हाती घेतल्याच्या घटनेला सहा महिने पूर्ण होत आहेत. ज्येष्ठ नगरसेवक असलेल्या श्री.काटे यांनी शहराध्यक्ष पदाची सूत्रे स्विकारल्यानंतर त्यांचा पहिला सत्कार राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या जिल्हा कार्यालयात भार्गव सदन येथे पार पडला. तर दुसरा सत्कार स्वातंत्र्यवीर सावरकर सामाजिक



संस्थेतर्फे झाल्यानंतर संघटनात्मक कामकाजात त्यांनी स्वतःला झोकून दिले. कार्यकर्त्यांचे संघटन, बांधणी, जनसेवा आणि पक्षनिष्ठा या चार सूत्रांवर काम करण्यास काटे यांनी प्रारंभ केला. आपल्या नेतृत्वाखाली कार्यकारिणी निवडताना त्यांनी शहर पातळीवर काम करू इच्छिणाऱ्या तीनशेपेक्षा अधिक कार्यकर्त्यांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या व त्यामधून आपल्या टीमची बांधणी केली. अशा प्रकारच्या या वैशिष्ट्यपूर्ण निवड प्रक्रियेची पक्ष पातळीवर राज्य स्तरावर नोंद घेण्यात आली. मागील सहा महिन्यातील प्रमुख कामांमध्ये सर्वाधिक यशस्वी झालेला संपूर्ण शहरभर पडसाद उमटलेला कार्यक्रम म्हणजे भारतीय सैन्य दलाला वंदन करण्यासाठी शहर भाजपने आयोजित केलेली तिरंगा पदयात्रा होय. भाजपचे मित्र पक्ष व त्यांचे कार्यकर्ते देखील यामध्ये सहभागी झाले होते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त अहिल्यादेवी स्मारक स्वच्छता अभियान तसेच चौंडी येथे महिलांचा विशेष भेट दौरा हा कार्यक्रमही महत्वपूर्ण म्हणून नोंदला गेला. आत्मनिर्भर भारत ते विकसित भारत कार्यशाळा, पश्चिम महाराष्ट्र विभागातील सर्व नवनियुक्त मंडल अध्यक्षांची कार्यशाळा, आणीबाणीतील लढवय्यांचा गौरव, संकल्प सिद्धी ते चौपाल सभा, पंतप्रधान मोदी यांच्या अकरा वर्षाच्या कारकीर्दी निमित्त विविध उपक्रमांचा धडाका,समरसता रक्षाबंधन उपक्रमांतर्गत १ लाख ४५ हजार राख्या संकलन अभियान,ऑपरेशन सिंदूर विजयोत्सव, स्वातंत्र्यसैनिक स्मारक स्वच्छता अभियान, राष्ट्रपिता ते राष्ट्रनेता उपक्रम,पंतप्रधानांच्यावाढदिवसानिमित्त सेवा पंधरवडा अभियान, आत्मनिर्भर भारत अभियान, जीएसटी अभियान आदी प्रमुख पक्षीय कामकाज संघटनेच्या माध्यमातून त्यांनी यशस्वी करून दाखवले. शहर विकास आराखड्याबाबत नागरिकांचे प्रश्न भाजपच्या चारही आमदारांशी समन्वय साधून अधिवेशनात मांडण्यासाठी पुढाकार घेणे,पक्षाचे मेळावे, अधिवेशन, मंडल कामकाजाचे उपक्रम, याचबरोबर गणेशोत्सव, दहीहंडी, दसरा, दिवाळी या सार्वजनिक सण व उत्सवाच्या माध्यमातून भारतीय जनता पक्षाची प्रतिमा व प्रतिष्ठा उंचावण्यासाठी सक्रिय सहभाग त्यांनी घेतला.चोवीस तास कार्यकर्त्यांच्या संपर्कात राहून त्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करणे, त्यांना वेळ देणे,या सारख्या कामांमुळे सहामाही काळातच त्यांनी घेतलेली झेप महत्वपूर्ण ठरली गेली.

# पिंपरी चिंचवड शहर विकास आघाडीची बैठक संपन्न

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड शहर विकास आघाडीची आगामी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महत्वाची बैठक पिंपरी चिंचवड शहर विकास आघाडीचे संस्थापक अध्यक्ष अभय भोर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी उद्योजक कामगार आणि कार्यकर्ते मूलभूत हक्क मिळविण्यासाठी निवडणुकीत उभे राहणार शहरातील वाढत्या नागरी समस्या, उद्योगांचे संरक्षण, रोजगार निर्मिती आणि स्थानिकांच्या हक्कांचे प्रश्न या बैठकीत प्रमुखतेने उपस्थित करण्यात आले.




**बैठकीतील प्रमुख निर्णय**

१. पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणुकीत२. पिंपरी चिंचवड शहर विकास आघाडी तर्फे उमेदवार उभे राहणार असल्याची अधिकृत घोषणा करण्यात आली.३. शहराचा निर्णय शहरातील लोकांनी घ्यावा हा हेतू यामागे आहे.४. प्रत्येक प्रभागात छोटे-मोठे स्टार्टअप उद्योग उभारण्याची योजना आखण्यात आली.यामुळे महिलांना घराजवळच रोजगार उपलब्ध होईल.५. शहरातील युवक–युवतींसाठी प्रत्येक भागात कौशल्य विकास केंद्र सुरू करण्यात येणार आहेत, ज्यामुळे रोजगारक्षमता मोठ्या प्रमाणात वाढेल.६. शासनाने घेतलेल्या स्थानिकांच्या जमिनी, सर्वेक्षणातील तफावत, नुकसानभरपाईतील अन्याय या सर्व विषयांवर आघाडी सक्त भूमिका मांडणार आहे.७. रस्ते, पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन, वाहतूककोंडी, सार्वजनिक सुविधा, वाढते प्रदूषण अशा मूलभूत नागरी समस्यांवर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली. ८. कामगार हक्क, महिला सुरक्षा आणि ज्येष्ठ नागरिक–खेळाडूंना सुविधा यासाठी स्वतंत्र उपक्रम राबवण्याचा निर्णय घेतला.

बैठकीला फुगेवाडी, दापोडी, भोसरी, दिघी, पिंपरी, चिंचवड, आकुर्डी, काळेवाडी, मोशी, कासारवाडी आदी भागातील अनेक सामाजिक कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते. अध्यक्ष अभय भोर यांनी सांगितले की, शहराला पुन्हा औद्योगिक ओळख मिळवून देण्यासाठी, आणि बेरोजगारी कमी करण्यासाठी सक्षम नेतृत्वाची गरज आहे.

त्यामुळेच विकास आघाडी आता थेट निवडणुकीत उतरत आहे.” आगामी काळात महानगरपालिका निवडणुकीचा सविस्तर आराखडा जाहीर करण्यासाठी दुसरी बैठक लवकरच आयोजित करण्यात येणार असल्याचे शरविकास आघाडीचे अध्यक्ष अभय भोर यांनी प्रसिद्धी पत्राद्वारे सांगितले.

# 'आम्ही सावित्रीच्या मायलेकी' महाकाव्य संमेलनाचे आयोजन

## 'क्रांतिसूर्य सावित्रीज्योति पुरस्कार' रोकडे दांपत्यास जाहीर

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे: विश्वबंधुता मूल्यसंवर्धन समिती, काषाय प्रकाशन आणि बंधुता प्रकाशन या संस्थांच्या वतीने संविधान दिनानिमित्त एक दिवसीय 'आम्ही सावित्रीच्या मायलेकी' या महाकाव्य संमेलनाचे आयोजन केले आहे. संविधान दिनानिमित्त आयोजित हे काव्यसंमेलन मंगळवार, दि. २५ नोव्हेंबर २०२५ रोजी नवी पेठेतील एस. एम. जोशी सभागृहात होणार आहे, अशी माहिती विश्वबंधुता साहित्य परिषदेचे सरचिटणीस प्रा. शंकर आथरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.**




प्रसंगी संमेलनाध्यक्ष संगीता झिंजुरके, स्वागताध्यक्ष सीमा गांधी, प्रा. भारती जाधव आणि प्रा. सायली गोसावी उपस्थित होते.प्रा. शंकर आथरे म्हणाले, "संमेलनात दिला जाणारा 'क्रांतीसूर्य सावित्रीज्योति पुरस्कार' यंदा बंधुता चळवळीत गेल्या ५१ वर्षांपासून योगदान देणाऱ्या मंदाकिनी आणि बंधुताचार्य प्रकाश रोकडे यांना जाहीर करण्यात आला आहे. सत्यशोधकी पगडी, प्रबोधनाची लेखणी आणि मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. रयत शिक्षण संस्थेच्या पिंपरी येथील कन्या महाविद्यालयास 'ज्ञानज्योति सावित्रीबाई फुले ज्ञानसाधना पुरस्कार' प्रदान करण्यात येईल. ज्येष्ठ साहित्यिका आणि विचारवंत डॉ. अश्विनी धोंगडे यांच्या हस्ते या पुरस्कारांचे वितरण होणार आहे."संविधान दिनाच्या औचित्याने संमेलनामध्ये 'संविधान सन्मान आदर्श पत्रकारिता पुरस्कार' प्रदान केले जाणार आहेत. यामध्ये महिमा ठोंबरे (सकाळ), नम्रता फडणीस (लोकमत), सुवर्णा चव्हाण (पुढारी), कल्पना खरे-साठे (केसरी), मेधा पालकर (सामना), प्रीती पाठक (भास्कर), अर्चना मोरे (पुणे मिरर), कल्याणी फडके (महाराष्ट्र टाइम्स), शिवानी पांढरे (एबीपी माझा), गजाला सय्यद (शबनम न्यूज), वनिता चौधरी (साहित्यलीला पंढरी), सायली नलावडे-कविटकर (सहस्त्रजीत मीडिया) यांना सन्मानित करण्यात येणार असल्याचे संमेलनाध्यक्षा संगीता झिंजुरके यांनी सांगितले ज्येष्ठ साहित्यिका डॉ. सविता पाटील यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन होईल. दुपारी ज्येष्ठ कवयित्री प्रिया माळी यांच्या अध्यक्षतेखाली 'सावित्रीची काव्यफुले' काव्यसंमेलन होईल.

त्यामध्ये तीसहून अधिक प्रतिथयश कवयित्री सहभागी होतील. संमेलनामध्ये सावित्रीबाई फुले साहित्य पुरस्कार, आदर्श विद्यार्थिनी पुरस्कार, आदर्श शिक्षिका पुरस्कारांचे वितरण होईल. संमेलनाच्या यशस्वीतेसाठी प्रशांत रोकडे परिश्रम घेत आहेत.

# आर.एम.सी. प्लांटवर महापालिका करणार कारवाई

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : पिंपरी चिंचवड महापालिका परिसरातील आर.एम.सी. प्लांट यांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत परवानगी दिली जाते. सदर आर.एम.सी. प्लांटमुळे होणारे वायू प्रदूषण रोखण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत योग्य त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.**




मात्र काही आर.एम.सी. प्लांट धारकांकडून सदर उपाययोजनांची अंमलबजावणी होत नसून त्यामुळे वायू प्रदूषण होत असल्याच्या तक्रारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त होत होत्या.त्यानुसार प्रदूषण मंडळाने महापालिका पर्यावरण विभागास पत्र पाठवून महापालिका परिसरातील एकूण ३० प्लांटची यादी सील करण्यासाठी दिली आहे. त्या अनुषंगाने ज्या आर.एम.सी. प्लांटच्या ठिकाणी वायू प्रदूषण नियंत्रणासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत, असे प्लांट बंद करण्याची कारवाई महापालिकेकडून केली जाणार आहे.पिंपरी चिंचवड शहरातील हवेची गुणवत्ता मानकांच्या मर्यादित राहावी, तसेच नागरिकांना वायू प्रदूषणाचा त्रास होऊ नये, याकरिता पिंपरी चिंचवड महापालिकेकडून दक्षता घेण्यात येत आहे. त्याकरिता महापालिकेने ग्रेडेड रिस्पॉन्स ॲक्शन प्लॅनची (ग्रॅप) अंमलबजावणी केलेली आहे. तसेच शहरातील पर्यावरणविषयक समस्या व तक्रारींचे तात्काळ निरसन करण्यासाठी दोन उपद्रव शोध पथकांची नेमणूक केलेली आहे. त्यानुसार शहरातील वायू प्रदूषणास जबाबदार असणाऱ्या दोषींवर कारवाई करण्यात येत आहे. याच अनुषंगाने आता प्रदूषण मंडळाचे पत्र प्राप्त होताच ज्या आर.एम.सी. प्लांटच्या ठिकाणी वायू प्रदूषण नियंत्रण प्रणाली किंवा उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत, त्यावर कारवाई करण्यात येणार आहे.

**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे पत्रान्वये आर.एम.सी. प्लांट कार्यान्वित करण्याबाबत महत्त्वाचे नियम:**

१. आर.एम.सी. प्लांटच्या परिसरात धूळ प्रदूषण नियंत्रणासाठी 'वॉटर स्प्रिंकलिंग सिस्टम' वापरणे अनिवार्य आहे.२. मिक्सिंग ऑपरेशन्स बंदिस्त जागेतच करणे बंधनकारक आहे.३. खडी, वाळू, क्रश सँड यांच्या वाहतुकीदरम्यान वायू प्रदूषण होऊ नये, याकरिता वाहनांना ताडपत्रीने झाकण्यात यावे.४. कार्यान्वित असलेले आर.एम.सी. प्लांट मर्यादित वायू प्रदूषणाच्या पातळीत असल्याचे व निर्धारित कालावधीतच कार्यान्वित ठेवणे बंधनकारक आहे.५. आर.एम.सी. प्लांटच्या परिसरातील ध्वनीची पातळी निर्धारित मर्यादेपेक्षा जास्त नसावी.

# सॉफ्टबॉल स्पर्धेत आबेदा इनामदार ज्युनिअर कॉलेजला विजेतेपद

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : खासदार चषक अंतर्गत सॉफ्टबॉल स्पर्धेत, एकोणीस वर्षाखालील मुलींमध्ये आबेदा इनामदार ज्युनिअर कॉलेज ने विजेतेपद मिळवले. सामन्याच्या उद्घाटन माननीय खासदार पुणे, केंद्रीय नागरी विमान वाहतूक आणि सहकार मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते झाले व इतर मान्यवर उपस्थित होते.या सामन्यात स. प. महाविद्यालयाचा पराभव झाला असून ९-२ असा स्कोअर होता.**




सामन्यादरम्यान अलफिया अन्सारी हिने उत्कृष्ट पिचिंग करत, एक होम रन केला. तिला कॅचर म्हणून यास्मिन शेख हिची उत्तम साथ लाभली. आबेदा इनामदार ज्युनिअर कॉलेजचे प्रशिक्षक म्हणून गुलजार शेख, विष्णू जाधव, शुभम मुके, अतिक शेख याचे उत्तम मार्गदर्शन संघाला लाभले. स. प. महाविद्यालयाच्या मुलींनी देखील चुरशीची लढत दिली. या संघाला मार्गदर्शन वैभव ठोंबरे, अतुल जगताप यांनी केले.

आबेदा संघाने नाणेफेक जिंकत सामना देखील आपल्या नावावर केला. सतरा वर्षांखालील मुले, या स्पर्धेचा दुसरा उपांत्य फेरीचा सामना अँग्लो उर्दू बॉईज कॉलेज आणि पी.के. जेम्स स्कूल यांच्यात झाला असून, अँग्लो उर्दू संघाने पी. के. जेम्स स्कूल चा १५ - ४ रन करून पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला आहे.

संघाचे प्रशिक्षक विष्णू जाधव यांचे सहकार्य तसेच खेळाडूंची उत्तम साथ सामन्यात दिसून आली.

तसेच चौदा वर्षाखालील मुले सामन्यात मॉडर्न हायस्कूल शिवाजीनगर संघाने तृतीय क्रमांक पटकावला. संघाचे मार्गदर्शक गणेश नांगरे यांनी उत्तम अशी रणनीती आखून खेळाडूंना प्रोत्साहित केले.

सतरा वर्षांखालील मुलांच्या उपांत्य फेरीत मॉडर्न संघाचा विजय झाला असून हा संघ अंतिम फेरीसाठी दावेदार ठरला आहे. मॉडर्न संघाने १७-७ असे होम रन करत बी. व्ही. बी संघाला हरवून एक नवा विक्रम केला आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968

# लवकरच....!


मेट्रो सिटी
आयकॉन अवॉर्ड २०२५
METRO CITY ICON
AWARD 2025
दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत वर्धापन दिन निमित्त
पुरस्कार सोहळा २०२५
वर्ष तिसरे
मे
सामाजिक,शैक्षणिक,राजकीय,वैद्यकीय, व्यावसायिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना मेट्रोसिटी आयकॉन अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात येत आहे.
– आयोजक –
शबनम न्यूज मिडिया ग्रुप
शबनम न्यूज | दैनिक मेट्रोसिटी वृत्तांत | सिटीझन मीडिया | सनशाईन ग्राफिक्स
अधिक माहिती साठी संपर्क : 7218327321 / 7620889734